# तंत्रज्ञान : एकात्मिक शेती पद्धतीचे

सौ. संस्कृती संग्राम पाटील
विषय विशेषज्ञ (कृषि विद्या)
कृषि विज्ञान केंद्र, सांगली – II

### एकात्मिक शेती पद्धती म्हणजे काय?

थॉमस जेफरसन यांच्या मते, ''शेती हा आपला सर्वांत शहाणपणाचा व्यवसाय असून, त्यातून अंतिमतः सर्वांत खऱ्या संपत्तीची, नैतिक मूल्यांची आणि आनंदाची निर्माण होत असते.''

"शेतीशी संबंधित वेगवेगळ्या प्रकारचे व्यवसाय आणि पिकांच्या वैविध्यपूर्ण पध्दती सर्वांची एकत्रितपणे सांगड घालून उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन मिळवणे याला एकात्मिक शेती पद्धती असे म्हणतात."

साखळी प्रकारची ही एक शेती पद्धती आहे जी शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावते.

### एकात्मिक शेती पद्धतीची वैशिष्ट्ये:

- पीक फेरपालट
- हवामानानुसार आणि स्थानानुसार बदल
- जैविक खतांचा अधिकतम वापर
- संवर्धन स्वरूप
- शून्य मशागत तंत्र
- रासायनिक घटकांचा न्यूनतम वापर

### एकात्मिक शेती पद्धतीची संकल्पना:

- शेतीमध्ये आंतरपीक, मिश्रपीक, सापळा पिके, कुंपणे यांचा समावेश केला जातो.
- नियमित पिकपद्धती सोबतच पशुपालन यामध्ये मुख्यत: गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या, वराह इत्यादींचा समावेश असतो. तसेच पक्षीपालनामध्ये कोंबडी, बदक, टर्की, ससा इ. घेता येतात आणि मस्त्यपालनामध्ये कोळंबी, मासे, शिंपले, मोती आणि कालव यांचा समावेश करता येतो.
- याबरोबरच मधुमक्षिकापालन, अळिंबी उत्पादन तसेच रेशीम उद्योग यांची फळबागासोबत सांगड घालता येते.
- या सर्व घटकांमधून मिळणारे टाकाऊ पदार्थ आपण पुन्हा शेतीमध्ये वापरू शकतो जसे की बायोगॅस नंतर तयार होणाऱ्या स्लरीचा आपण वापर करू शकतो.
- पूरक व्यवसायातून वर्षभर उत्पन्न मिळेल असे नियोजन आपल्याला करावे लागते.
- यामध्ये क्षेत्राचे नियोजन करताना ४० % क्षेत्र धान्य पिकांसाठी, प्रत्येकी १० % क्षेत्र कडधान्य आणि गळीत पिकांसाठी, १५ ते २० % क्षेत्र फळबागासाठी, १० ते १२ % क्षेत्र चारा पिकांसाठी, ३ % क्षेत्र पशुपालन/शेळीपालन/कुक्कटपालनासाठी, ४ % क्षेत्र शेडनेटसाठी आणि राहिलेले क्षेत्र गांडूळखत आणि शेतमाल प्रक्रिया असे प्रारूप असावे. यामधुन बागायतीसाठी आणि जिरायतीसाठी उपयुक्त मॉडेल तयार करावे लागते.

### एकात्मिक शेती पद्धतीची फायदे:

- उत्पन्न आणि उत्पादकता यामध्ये वाढ
- आहारासाठी संतुलित अन्न
- शाश्वत उत्पादकता
- प्रदूषण मुक्त वातावरण
- नवीन तंत्रज्ञानाची ओळख
- सातत्याने मिळणारा पैसा
- निसर्गाचे संवर्धन
- अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी वरदान
- रोजगार निर्मिती करणारी एक आदर्श पध्दती
- बाह्य निविष्ठावरील खर्चाची बचत
- ऊर्जा समस्येवर योग्य उपाय
- पिक अवशेषांची योग्य विल्हेवाट

### पिक पध्दती व शेतीशी निगडित उद्योग यांची सांगड:

- पिक पध्दती + गाई/म्हशी + गांडूळखत उत्पादन + भाजीपाला + बांधावरील फळझाडे
- पिक पध्दती + मस्त्यपालन + अळिंबी उत्पादन + रेशीम शेती
- पिक पध्दती + कुक्कुटपालन किंवा पशुपालन + फळझाडे
- पिक पध्दती+ शेळी/मेंढी/वराहपालन + भाजीपाला

★ ★ ★

(संपर्क: +९१ ८६००१८०६४४)

### भारतातील शेळ्यांच्या जाती

१) उत्तरीय थंड प्रदेशातील शेळ्या: गद्दी, चेंगथांगी, चेगू
२) पंजाब, हरियाणा, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश या विभागातील शेळ्या: बीटल, सिरोही, जमनापारी, बारबेरी, सुरती, झालवाडी, मारवाडी, मेहसाणा, कच्छी, गोहीलवाडी
३) महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ या विभागातील शेळ्या: बैरारी, संगमनेरी, उस्मानाबादी, कोकण कन्याळ, मलबारी
४) ओरिसा, बिहार, आसाम, पश्चिम बंगाल या विभागातील शेळ्या: गंजम, काळी बंगाली इत्यादी मान्यताप्राप्त शेळ्यांच्या जाती आहेत.

पण याव्यतिरिक्त भारतात रामधन, केल, शिंगारी, शेखावती, पर्बतसर, पंतजा, ओरिसा ब्राऊन, मालकनगिरी, वेलाडू, कन्नीअडू, दक्खनी, जैनपूरी, चोरखा बिरारी, खागनी, जखराना, कुई आणि गुड्डी यांसारख्या कितीतरी जाती दुर्लक्षित राहिल्या आहेत.

महाराष्ट्रातील शेळ्यांच्या जाती: उस्मानाबादी, संगमनेरी आणि कोकण कन्याल या जाती विशेष प्रसिद्ध आहेत.